मायबाप
लेक चालली सासरी

माय उभी राहे दारी
विवाहाचे तप झाले
माया दाटतेच उरी
माय डोळे पुसते का?
त्या विरहाच्या यातना
ऊरी भावनांचा पूर
पाठवणी करताना
बाप घरामध्ये माझा
डोळे टिपतो लपून
कष्ट केले संसारात
मला जपतो अजून
माय खंतावते कधी
पोर दूर किती राहे
मायेचाच हात सदा
पाठीवर फिरताहे
-- ---
- सौ. चित्रा क्षीरसागर